मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » बुधवार, दि. 21 ऑगस्ट 2024 | पान- 1

# रवी लांडगे यांचा ठाकरे गटात प्रवेश

## पिंपरी-चिंचवड ते मुंबईपर्यंत जोरदार शक्तीप्रदर्शन : भोसरीतून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक आणि भोसरीतून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या रवी लांडगे यांनी शेकडो समर्थकांसह आज (मंगळवारी) शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात प्रवेश केला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवबंधन बांधून त्यांचे स्वागत केले.

यावेळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खासदार संजय राऊत, आमदार सचिन अहिर, आमदार मिलींद नार्वेकर यांच्यासह पिंपरी-चिंचवडमधील शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी देखील उपस्थित होते. या पक्ष प्रवेशापूर्वी रवी लांडगे व त्यांच्या समर्थकांनी पिंपरी-चिंचवड ते मुंबईपर्यंत जोरदार शक्तीप्रदर्शन केले. तब्बल 500 हून अधिक गाड्या आणि हजारो कार्यकर्त्यांसह लांडगे यांनी मातोश्रीपर्यंत जंगी शक्तीप्रदर्शन केले. या पक्ष प्रवेशाची भोसरीपासून ते पुणे-मुंबई एक्स्प्रेस-वे तसेच मातोश्रीपर्यंत पक्ष प्रवेशाची जोरदार बॅनरबाजी करण्यात आली होती. लांडगे यांनी पक्षाकडून दिली जाणारी जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणार असल्याचे सांगितले. तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी काम करणार असल्याचा इरादाही त्यांनी स्पष्ट केला.



पक्ष प्रवेशासाठी मुंबईला जाण्यापूर्वी पत्रकारांशी संवाद साधताना रवी लांडगे म्हणाले की, जनसंघापासून कुटुंबियांनी भाजपची प्रामाणिकपणे सेवा केली. परंतु, आमदार महेश लांडगे हे भाजपमध्ये आल्यापासून पक्षाचा विचार बाजूला ठेवला आहे. वेगळ्या पद्धतीची त्यांची कार्यपद्धत आहे. त्यांच्यामाध्यमातून भोसरीतील प्रत्येक कामात भ्रष्टाचार सुरु आहे. हुकुम, धडपशाही, सत्तेचा गैरवापर आणि लोकांना खोटी आश्वासने दिली जात आहेत. याला जनता कंटाळली असून भाजपचा प्रत्येक निष्ठावान कार्यकर्ता नाराज आहे. या चुकीच्या कार्यपद्धतीला कंटाळून आणि सहनशीलतेचा अंत झाल्याने भाजपचा समविचारी पक्ष असलेल्या शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतला आहे. भोसरीत शिवसेनेला मानणारा मोठा वर्ग आहे. उमेदवारी दिली तर मी नक्कीच विधानसभेची निवडणूक लढविणार आहे.

### भाजपचा राजीनामा दिल्यानंतर दोन वर्षांनी घेतला निर्णय

**» 2017 मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत रवी लांडगे हे भाजपचे बिनविरोध नगरसेवक म्हणून (Pimpri) निवडून आले होते. रवी लांडगे व त्यांचे कुटुंबीय हे पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात भाजपचे सर्वात जुने निष्ठावान म्हणून ओळखले जाते. असे असताना महापालिकेत भाजपची सत्ता आल्यानंतर लांडगे कुटुंबातील रवी यांना पदांपासून डावलण्यात आले. त्यामुळे ते नाराज झाले होते. त्यांनी दोन वर्षांपूर्वी भाजपचा राजीनामा दिला होता. दोन वर्षे वेट अँण्ड वॉचची भूमिका घेतल्यानंतर आता आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रवी यांनी ठाकरे गटात प्रवेश केला आहे.**

---

# शहरात डेंग्यू, टायफाईड, चिकनगुनियाच्या रूग्णांची संख्या वाढली

## शहरात जूनमध्ये डेंग्यूचे 3 रुग्ण, जुलैमध्ये 36 तर ऑगष्टमध्ये 48 रुग्णांची नोंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात यावर्षी जून महिन्यापासून आतापर्यंत डेंग्यूच्या ८७ रुग्णांचे निदान झाले आहे. पावसाळा सुरु झाल्यापासून रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. खाजगी रुग्णालयांच्या बाह्यरुग्ण विभागांमध्ये दररोज विषाणूजन्य आजारांची लक्षणे असणाऱ्या रुग्णांमध्ये दुपटीने वाढ झाली आहे. त्यामध्ये चिकनगुणिया, टायफाईड रूग्णांचाही समावेश आहे. पावसामुळे पाणी साचून राहिल्याने आणि डासांच्या प्रजननामुळे या प्रकरणांमध्ये वाढ होत असल्याचे डॉक्टर सांगत आहेत.

प्रशासनाच्या सांगण्यानुसार शहरामध्ये जूनमध्ये डेंग्यूचे ३ रूग्ण, तर जुलैमध्ये ३६, ऑगष्टमध्ये ४८ रूग्णांची नोंद आहे. प्रत्यक्षात खासगी रूग्णालयात गेल्यानंतर २० ते २५ रूग्ण डेंग्यूचे अॅडमिट असल्याचे चित्र पहायला मिळते.

मागील वर्षाच्या तुलनेत यंदा डेंग्यू, टायफाईड चिकनगुनिया प्रकरणांमध्ये वाढ होताना दिसून येत आहे. या आजारांमध्ये ताप, अतिसार, उलट्या होणे, डोकेदुखी आणि सांधेदुखीसारखी लक्षणे दिसून येतात.

फिजिशियन डॉ. किरण मुळे म्हणाले, ऑगष्टमध्ये या आजाराच्या रूग्णांमध्ये जुलैपेक्षा अधिक वाढ दिसून आली आहे. दररोज बाह्यरूग्ण विभागात उपचारासाठी येणारे बहुतांश रूग्ण हे तापाचे असतात. या रूग्णांमध्येही गेल्या दोन आठवड्यांत ७ ते १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. पावसाळ्यात दुषित पाण्यामुळे विविध संसर्गजन्य आजारांमध्ये वाढ होताना दिसून येत आहे. यात प्रामुख्याने डेंग्यू, मलेरिया, टायफाइड आणि चिकनगुनिया रूग्णांची संख्या अधिक दिसून येत आहे. म्हणून ताप आल्यास अंगावर न काढता वेळेवर चाचणी करून घेणे गरजेचे आहे.'




चिकनगुन्याचे सर्वांत प्रमुख लक्षण ताप हे आहे. या आजाराची लक्षणे सामान्य तापाच्या लक्षणांपासून भिन्न असतात. कारण त्यासोबत सांध्यांच्या तीव्र वेदना, मळमळ, पुरळ, डोकेदुखी आणि थकवा ही देखील लक्षणे आहेत. डेंग्यू तापाची लक्षणे ही इतर विषाणूजन्य आजाराच्या लक्षणांसारखीच असतात. अचानक चढणारा ताप, डोकेदुखी, अंगदुखी, सांधेदुखी व डोळयांमागे दुखणे ही लक्षणे आहेत. याशिवाय डेंग्यूमुळे रक्तस्त्राव होत असल्यास अंगावर न काढता तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे फिजिशियन डॉ. भाग्यश्री लहाणे-मुंडे यांनी सांगितले.

### काय काळजी घ्यावी?

**» सध्या मुलांमध्ये व्हायरल फिव्हरचे प्रमाण वाढलेले आहे. म्हणून पालकांनी दुर्लक्ष न करता मुलांनी विशेष काळजी घ्यावी. पावसाळ्यात पाणी साचल्याने त्यात डासांची उत्पत्ती होते, यामुळे डेंग्यू व चिकनगुनिया हा आजार होतो. डासांच्या उत्पत्तीची ठिकाणे शोधून ती नष्ट करा, घराबाहेर पाणी साचू देऊ नका, परिसरात वेळोवेळी फवारणी करा आणि डास प्रतिबंधक जाळीचा वापर करा.**

# महिला डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी पावले!

## 'बी.जे.'मध्ये आणखी 83 सुरक्षारक्षकांची लवकरच नियुक्ती : अतिरिक्त 100 सीसीटीव्ही बसविणार

**पुणे | प्रतिनिधी**

कोलकत्यातील वैद्यकीय महाविद्यालयात निवासी डॉक्टरवर बलात्कार करून तिचा खून करण्यात आल्याचा प्रकार घडला होता. या पार्श्वभूमीवर बी.जे.वैद्यकीय महाविद्यालयातील महिला निवासी डॉक्टरांची सुरक्षितता वाढविण्याचा निर्णय महाविद्यालय प्रशासनाने घेतला आहे. महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालयात आणखी ८३ सुरक्षारक्षक नेमले जाणार आहेत. याचबरोबर आवारात आणखी १०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत.



कोलकत्यातील घटनेच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयातील सुरक्षा उपाययोजनांचा आढावा अधिष्ठाता डॉ.एकनाथ पवार यांनी सोमवारी घेतला. या बैठकीला बंडगार्डन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. यलप्पा जाधव, उपअधीक्षक डॉ. सोमनाथ खेडकर, अधिसेविका आणि मार्ड पुणेचे उपाध्यक्ष डॉ.दस्तगीर जमादार आदी उपस्थित होते. या बैठकीत महाविद्यालय आणि रुग्णालयातील सुरक्षेबाबत चर्चा करण्यात आली. सुरक्षारक्षक आणि सीसीटीव्हींची संख्या वाढविण्याचा निर्णय या बैठकीत झाला.

याबाबत अधिष्ठाता डॉ. पवार म्हणाले की, महाविद्यालय आणि ससून रुग्णालयाच्या आवारात मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविलेले आहेत. महिला डॉक्टरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढविली जाणार आहे. सध्या महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या आवारात ३५३ सीसीटीव्ही कॅमेरे असून, आणखी १०० कॅमेरे बसविले जाणार आहेत. याचबरोबर सध्या २२० सुरक्षारक्षक असून, आणखी ८३ सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण संचालनालयाकडे पाठविण्यात आला आहे. याला मंजुरी मिळाल्यानंतर तातडीने या नियुक्त्या होतील.

महाविद्यालय आणि रुग्णालयाचे आवार खूप मोठे आहे. आपत्कालीन प्रसंगी अनेक महिला निवासी डॉक्टरांना रात्रीच्या वेळी एका विभागातून दुसऱ्या विभागात जावे लागते. या विभागांच्या इमारतींमधील अंतर अधिक आहे. यामुळे रात्रीच्या वेळी महिला सुरक्षारक्षक या डॉक्टरांसोबत सध्या सोबतीला देण्यात येत आहेत. याचबरोबर महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या आवारात सुरक्षारक्षक वेळोवेळी गस्त घालत आहेत. आवारात काही ठिकाणी पुरेसा उजेड नाही. अशा ठिकाणी पुरेशी प्रकाश व्यवस्था करण्यात येत आहे, असेही डॉ. पवार यांनी नमूद केले.

### निवासी डॉक्टरांचा संप

» कोलकत्यातील घटनेचा निषेध करण्यासाठी मार्डच्या वतीने १३ ऑगस्टपासून बेमुदत संप सुरू करण्यात आला आहे. बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयातील ५६६ निवासी डॉक्टरांपैकी ३८६ संपात सहभागी झाले असून, १८० कामावर आहेत. याचबरोबर एमबीबीएस पदवीचे २५० अंतर्वासित विद्यार्थीही या संपात सहभागी झाले आहेत. यामुळे रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागात रुग्णांच्या तपासणीसाठी इतर विभागातील शिक्षकांची मदत घेतली जात आहे. या संपामुळे ससून रुग्णालयातील रुग्णसेवेवर मोठा परिणाम होत आहे.

> बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला आहे. काही ठिकाणी सुरक्षा वाढविण्याची गरज आहे. अशा ठिकाणी सुरक्षा उपाययोजना तातडीने करण्याची पावले उचलली जात आहेत. संस्थेचा परिसर सुरक्षित राहावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत.
> **-डॉ. एकनाथ पवार, अधिष्ठाता, बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय.**

# पोर्श अपघात प्रकरणात आणखी दोघांना अटक

## आदित्य अविनाश सूद, आशिष सतीश मित्तल अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघात प्रकरणी मोठी अपडेट पुढे आली आहे. अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने दोघांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या दोघांनी अल्पवयीन मुलाचे वडील व बिल्डर विशाल अगरवाल यांना रक्ताचे नमुने बदल करण्यासाठी मोठी मदत केल्याचे उघड झाले आहे. या दोघांच्या माध्यमातून अगरवाल याने ससूनमधील डॉ. अजय तावरेसही संपर्क साधून रक्ताच्या नमुन्यात फेरफार केल्याचं आढळलं आहे.



पुणे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आदित्य अविनाश सूद (वय ५२), आशिष सतीश मित्तल (वय ३६) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. या पूर्वी या प्रकरणी बिल्डर विशाल अगरवाल, मुलाची आई शिवानी अगरवाल, ससून रुग्णालयातील फॉरेन्सिक विभागाचे प्रमुख डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर, अश्फाक मकानदार, अमर गायकवाड या आरोपींना अटक करण्यात आली आहे. हे सर्व आरोपी सध्या येरवडा कारागृहात असून आज त्यांच्या जामीन अर्जावर सुनावणी होणार आहे.

कल्याणीनगर भागात १९ मे रोजी मध्यरात्री अपघात झाला. भरधाव मोटारीच्या धडकेत संगणक अभियंता तरुण-तरुणीचा मृत्यू झाला होता. अपघातानंतर अल्पवयीन मुलाचे वडील विशाल याने ससूनमधील डॉ. तावरेशी संपर्क साधला. त्यासाठी मकानदार, गायकवाड यांच्या माध्यमातून चार लाखांची रक्कम देण्यात आली होती. अगरवालचे परिचित आदित्य सूद, आशिष मित्तल यांची डॉ. तावरेशी ओळख होती. त्यांच्या माध्यमातून अगरवालने डॉ. तावरेशी संपर्क साधल्याचे तपासात उघड झाले. गुन्हे शाखेकडून सोमवारी रात्री उशीरा सूद आणि मित्तल यांना अटक करण्यात आली. दोघांना अटक केल्यानंतर मंगळवारी न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

पुण्यात १९ मे रोजी कल्याणीनगर येथे बिल्डर विशाल अगरवालच्या अल्पवयीन मुलाने दारू पिऊन मद्यधुंद अवस्थेत अलिशाल पोर्शे कार चालवत दुचाकीवरून जाणाऱ्या अभियंता असलेल्या तरुण व तरुणीला जोरदार धडक दिली होती. या अपघातामध्ये दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. यानंतर आरोपी मुलाला अपघात प्रकरणात केवळ निबंध लिहिण्याची शिक्षा देण्यात आली होती त्यामुळे ही प्रकरण चांगलेच पेटले होते. यानंतर आरोपीचा जामीन रद्द करून त्याची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली होती. दरम्यान,आरोपीला वाचवण्यासाठी त्याच्या रक्ताचे नमुने बदलण्यात आले होते. या प्रकरणी वरील दोघांना पुणे पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी अनेक धक्कादायक माहिती आतापर्यंत पुढे आली आहे. आरोपी मुलासोबत कारमध्ये असलेल्या मित्रांचेही रक्ताचे नमुने बदलल्याचं पुढं आलं आहे. हे नमुने बदलल्याप्रकरणी आता आणखी दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

# इंद्रायणीत बुडून दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू

## महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान संचलित मोशीतील ‘वेदश्री तपोवन गुरुकुल’वर शोककळा



**पिंपरी | प्रतिनिधी**

महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान संचलित मोशीतील वेदश्री तपोवन संस्थेतील ७१ विद्यार्थी नारळी पौर्णिमेनिमित्त इंद्रायणी नदीवर स्नानासाठी गेले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने चौघे बुडू लागले. त्यातील दोघांचा मृत्यू झाला. अन्य एक विद्यार्थी बेपत्ता आहे. डुडुळगाव येथील हवालदार वस्तीजवळ सोमवारी (ता. १९) सकाळी साडेआठच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

श्रावण महिन्यातील नागपंचमी आणि नारळी पौर्णिमेला (रक्षाबंधन) नदीत स्नान करायची प्रथा असल्याने वेदश्री तपोवन संस्थेतील विद्यार्थी इंद्रायणी नदीत स्नानासाठी गेले होते. राज्यातील वेगवेगळ्या भागांतील हे विद्यार्थी असून, वेद अभ्यासासाठी आले आहेत. सर्वजण १६ ते १९ वर्षे वयोगटातील आहेत.

त्यातील चार विद्यार्थी बुडू लागल्याने त्यांना वाचविण्यासाठी जय ओमप्रकाश दायमा (वय १९, मूळगाव वणी, जि. नाशिक) पाण्यात उतरला. त्याने अर्चित दीक्षित आणि चैतन्य पाठक यांना पाण्याबाहेर काढले. मात्र, नाका-तोंडात पाणी गेल्याने तो अत्यवस्थ झाला. त्याला महापालिकेच्या पिंपरीतील यशवंतराव चव्हाण रुग्णालयात (वायसीएम) नेण्यात आले. पण, त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. अन्य दोन विद्यार्थी बेपत्ता झाले होते.

त्यातील ओंकार श्रीकृष्ण पाठक (वय १६, रा. पद्मावती गल्ली, लातूर) याचा मृतदेह आढळून आला. प्रणव रमाकांत पोतदार (वय १७, रा. खडा, ता. आष्टी, जि. बीड) बेपत्ता आहे. आळंदी नगरपरिषद व पिंपरी-चिंचवड महापालिका अग्निशमन दलाच्या जवानांनी त्याचा सायंकाळपर्यंत शोध घेतला. दरम्यान, रात्री उशिरा नातेवाइकांनी मुलांचे मृतदेह मूळ गावी नेले.

### सर्वांचाच कंठ दाटला...

चौघेजण बुडूत असताना अन्य विद्यार्थी दाटल्या स्वरात मदतीची याचना करीत होते. पण, तोपर्यंत त्यांच्या डोळ्यांसमोरच दोघे वाहून गेले आणि एकाचा मृत्यू झाल्याने सर्वांचाच कंठ दाटून आला होता. श्रावणी सोमवार आणि रक्षाबंधनच्या दिवशी सकाळच्या वेळेत ही घटना घडली. साधारण साडेनऊ- दहाच्या सुमारास ही खबर परिसरात सर्वत्र पसरली. सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी वेदपाठ शाळेत माहिती दिली.

तेथील लांडगे गुरुजींनी आळंदीतील माजी नगरसेवक प्रशांत कुऱ्हाडे यांना माहिती देऊन तत्काळ मदत मागितली. कुऱ्हाडे यांनी आळंदी नगर परिषद अग्निशमन दलाला कळविले. रबर बोटसह जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यातील प्रसाद बोराटे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे मोशी अग्निशमन दल आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाला कळविले.

भोसरी एमआयडीसी व आळंदी पोलिस ठाण्यातील अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. दुपारनंतर एनडीआरएफचे जवान आले. सर्वांनी बेपत्ता विद्यार्थ्यांचा शोध सुरू केला. एकाचा मृतदेह शोधण्यात यश आले. मात्र, प्रणव बेपत्ता आहे.

### घटनास्थळाकडे जाण्यास मनाई

विद्यार्थी बुडाले ते ठिकाण मोशी व डुडुळगाव हद्दीवरील हवालदार वस्ती तापकीरनगरजवळ आहे. या परिसरात इंद्रायणी नदीतून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा झाला आहे. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी नदीपात्रात खड्डे आहेत. त्यांचा अंदाज न आल्यानेच ही घटना घडली असावी, अशी शक्यता वर्तवली जात आहे. घटनास्थळाजवळ गर्दी झाली होती. मात्र, नदीपात्रापर्यंत जाण्यास पोलिसांनी मनाई केली होती.

### तपोवनसाठी काळा दिवस

**» संस्थेतील गुरुजी महेश नंदे, दिलीप लांडगे गुरुजी यांनी सांगितले की, अतिशय दुःखद अशी घटना घडली. वेदाभ्यास करणारी छोटी मुले होती. मुलांच्या जाण्याने आभाळ कोसळल्यासारखे झाले. सर्वजण एक परिवारप्रमाणे राहत होते. गुरुकुल पद्धतीने इथे शिक्षण दिले जाते. पण, अशी दुर्दैवी घटना घडल्याने सर्वांवर आघात झाला आहे. नदीत बुडालेले विद्यार्थी संस्थेत सहा-सात वर्षांपासून वेदाभ्यास शिकत होते. अतिशय मनमिळाऊ आणि अभ्यासू होते. आजच्या घटनेने अन्य विद्यार्थ्यांना धक्का बसला आहे. पाठशाळेसाठी आजचा काळा दिवस ठरला.**

“ ‘इंद्रायणी नदीत विद्यार्थी बुडाल्याच्या घटनेप्रकरणी अकस्मात घटना अशी नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे. त्यात जे निष्पन्न होईल त्यानुसार कारवाई केली जाईल. बेपत्ता मुलाचा सायंकाळपर्यंत शोध घेतला. पण, अंधार पडल्याने शोधकार्य थांबविण्यात आले.

**- डॉ. शिवाजी पवार, पोलिस उपायुक्त, पिंपरी-चिंचवड.**

# रस्त्यावरच फेकला जातोय घातक कचरा

## वायसीएमकडे जाणाऱ्या पदपथावर कचऱ्याचा ढीग : बायोमेडिकल वेस्ट संकलनाकडे पालिकेच्या आरोग्य विभागाचे दुर्लक्ष



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरीतील एचए कंपनीच्या पेट्रोल पंपाकडून वायसीएम रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पदपथावर बायोमेडिकल वेस्ट फेकण्यात आला आहे. रस्त्यावरील पदपथावर अशा कचऱ्याचे ढीग पडलेले असतात. हा घातक कचरा उघड्यावर टाकला गेला असून बायोमेडिकल कचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

महापालिका हद्दीतील संत तुकारामनगर परिसरात रस्त्यालगत फुटपाथवर बायोमेडिकल कचरा टाकण्यात आला आहे. या ठिकाणी गोळ्या, औषधे, इंजेक्शन असा कचरा टाकला गेला आहे. हा कचरा मेडिकलचा की दवाखान्यातील आहे. याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत. शहरातील रुग्णालये, दवाखाने येथील बायोमेडिकल वेस्ट प्लास्टिक पिशवीत भरून तो कचरा दररोज पदपथावर टाकला जात आहे. मात्र, हा घातक कचरा उघड्यावर किंवा रस्त्यालगत कुठेही टाकला जात असल्याचे दिसत आहे.

महापालिकेने रुग्णालये, दवाखाने या ठिकाणचा बायोमेडिकल कचरा गोळा करण्यासाठी ठेकेदार नियुक्त केला आहे. आरोग्य वैद्यकीय विभागाने १५ वर्षांसाठी संबंधित ठेकेदाराला काम दिले आहे. शहरातील कचरा संकलन करून शास्त्रोयुक्त पद्धतीने हा नष्ट करण्याची जबाबदारी या ठेकेदारावर आहे. परंतु अनेकदा दवाखान्याचा बायोमेडिकल वेस्ट उघड्यावर सापडत असल्याचा प्रकार उघडकीस येत आहे. गेल्या काही महिन्यांपासून हा प्रकार सर्रास सुरू आहे. तरीही महापालिका हद्दीत अनेक रुग्णालय, दवाखाने, मेडिकल परिसरात फेरफटका मारला तर अनेक ठिकाणी बायोमेडिकल वेस्ट उघड्यावर टाकला जात दिसून येईल. त्यामुळे हा घातक कचरा संकलन करणाऱ्या ठेकेदाराच्या कामावर देखील प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

वास्तविक महापालिकेने बायोमेडिकल वेस्टसाठी खासगी ठेकेदार कंपनीला काम दिले आहे. असे असतानाही रुग्णालये, दवाखाने या ठिकाणचा कचरा उघड्यावर पडल्याने ठेकेदाराचा निष्काळजीपणा समोर येऊ लागला आहे.

### कचरा संकलनाकडे दुर्लक्ष

**» महापालिका ठेकेदार कंपनीच्या माध्यमातून शहरातील रुग्णालये, दवाखान्यात बायोमेडिकल वेस्ट संकलनासाठी शुल्क आकारला जातो. शुल्काची आकारणी दवाखान्यात बेडच्या संख्येनुसार केली जाते. परंतु, रुग्णालये, दवाखान्यातील घातक कचरा नियमित उचलला जातो की नाही यावर मात्र महापालिकेच्या आरोग्य वैद्यकीय विभागाचे लक्ष नसल्याचे दिसून येत आहे.**

# मंकीपॉक्सबाबत सरकारला अखेर जाग!

## जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्सला जागतिक आरोग्य संकट घोषित

**पुणे | प्रतिनिधी**

जगभरात काही ठिकाणी मंकीपॉक्स या आजाराची साथ दिसून येत आहे. यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्सला जागतिक आरोग्य संकट घोषित केले. यानंतर मंकीपॉक्स संसर्गाचा वेग लक्षात घेऊन केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या. या पार्श्वभूमीवर आता राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागानेही मंकीपॉक्सबाबत मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत.

मंकीपॉक्सबाबत काही राज्यांनी मार्गदर्शक सूचना आधीच जाहीर केल्या आहेत. महाराष्ट्रात परदेशी विद्यार्थ्यांची संख्या जास्त असूनही राज्याच्या आरोग्य विभागाने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या नव्हत्या. त्यामुळे मंकीपॉक्सच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत स्थानिक यंत्रणांसमोर प्रश्न उपस्थित झाले होते. यानंतर खडबडून जागे झालेल्या आरोग्य विभागाने २४ तासांच्या आत तातडीने सोमवारी (ता.१९) मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत.

मंकीपॉक्सच्या आजाराबाबत जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या इशाऱ्यानुसार केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्यांना मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. यामध्ये सर्व विमानतळ, बंदरे आणि आरोग्य विभागांना दक्ष करणे, चाचणी प्रयोगशाळा तयार करणे, तपासणीसाठी आरोग्य सुविधा तयार करणे, मंकीपॉक्सचा एखादा रुग्ण सापडल्यास तत्काळ उपाययोजना करण्यात याव्यात याचा सामावेश आहे. यानुसार राज्याने याबाबत सर्वेक्षण, प्रतिबंधक मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत.




### संशयित रुग्णाची लक्षणे

- परदेश प्रवास केलेल्या व्यक्तीच्या शरीरावर पुरळ
- सुजलेल्या लसिका ग्रंथी
- ताप
- डोकेदुखी
- अंगदुखी
- प्रचंड थकवा
- घसा खवखवणे आणि खोकला

### काळजी काय घ्यावी...

- संशयित मंकीपॉक्स रुग्णास वेळीच विलग करणे.
- रुग्णांच्या कपड्यांशी अथवा अंथरुण-पांघरुणाशी संपर्क येऊ न देणे.
- हातांची स्वच्छता ठेवणे.
- आरोग्य संस्थांमध्ये मंकीपॉक्स रुग्णावर उपचार करताना पीपीई किटचा वापर करणे.
- नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शासनातर्फे देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करणे.

> मंकीपॉक्स या आजाराविषयी आरोग्य विभागाकडून काळजी घेण्यात येत आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात मंकीपॉक्स सर्वेक्षण, प्रतिबंध आणि नियंत्रण उपाययोजना करण्याबाबतचे निर्देश सार्वजनिक आरोग्य विभागाने क्षेत्रीय आरोग्य उपसंचालक, आरोग्य अधिकारी, महापालिकांचे आरोग्य अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक यांना दिले आहेत.
> - अमगोथू श्री रंगा नायक, आयुक्त, आरोग्य विभाग.

# महावितरणच्या गलथान कारभाराविरोधात नागरिकांचा मोर्चा

## महावितरणच्या गलथान व नियोजनशून्य कारभारामुळे नागरिकांना विजेची समस्या

**पुणे | प्रतिनिधी**

मोहननगर, चिंचवड स्टेशन, आनंद नगर, साईबाबा नगर, गवळीवाडा, इंदिरानगर, काळभोर नगर, महात्मा फुलेनगर, रामनगर, दत्तनगर, विद्यानगर, शंकर नगर, परशुराम नगर या परिसरातील महावितरणचा वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे. महावितरणच्या गलथान व नियोजनशून्य कारभारामुळे नागरिकांना विजेची समस्या येत असल्याने परिसरातील नागरिकांनी नागरी हक्क कृती समितीच्या माध्यमातून मंगळवारी (दि. 20) थेट महावितरणच्या थरमॅक्स चौकातील कार्यालयावर मोर्चा काढला.






विजेच्या लपंडावामुळे मोहननगर, चिंचवड स्टेशन, आनंद नगर, साईबाबा नगर, गवळीवाडा, इंदिरानगर, काळभोर नगर, महात्मा फुलेनगर, रामनगर, दत्तनगर, विद्यानगर, शंकर नगर, परशुराम नगर या परिसरातील नागरिक हैराण झाले आहेत. तसेच परिसरातील अनेक नागरिकांना डेंग्यू, चिकनगुनियाची लागण होऊन ते रुग्णालयामध्ये उपचार घेत आहेत.

विजपुरवठा सुरळीत नसल्याने सतत अंधार असल्याने चोऱ्यामोऱ्या वाढल्या आहेत. या विजेच्या लपंडावामुळे अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणाचे नुकसान होऊन आर्थिक फटका नागरिकांना बसत आहे. महावितरणच्या गलथान व नियोजन शून्य कारभारामुळेच अनेक नागरिकांना शारीरिक, मानसिक, आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या समस्येचे कायमस्वरूपी निराकरण व्हावे यासाठी अनेकांनी महावितरणला वेगवेगळी निवेदने यापूर्वी दिली होती. मात्र यावर कायमस्वरूपी कुठलाही उपाय निघाला नाही.

संतापलेल्या नागरिकांनी मंगळवारी सकाळी थेट महावितरण कार्यालयावर मोर्चा काढला. सकाळी दहा वाजता श्री दत्त मंदिर चौक मोहननगर येथून मोर्चाला सुरुवात झाली. मोहननगर पासून थरमॅक्स चौकातील महावितरण कार्यालयापर्यंत पोलिसांचा बंदोबस्त लावण्यात आला होता. हा मोर्चा मोहननगर-महात्मा फुले नगर-दत्तनगर-विद्यानगर-शंकरनगर-रामनगर-परशुराम नगर मार्गे महावितरणच्या थरमॅक्स चौकातील आकुर्डी विभागीय कार्यालयात धडकला.

महावितरणचे मुख्य अभियंता अतुल देवकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता अशोक जाधव यांनी नागरिकांचे निवेदन स्वीकारले. नागरिकांच्या मागण्यांबाबत महावितरण कडून लेखी आश्वासन देण्यात आले. मोर्चामध्ये सामाजिक, राजकीय, व्यापार, लघुउद्योजक, हातगाडी पथारी टपरी धारक मोठ्या संख्येने सहभागी झाले.